# पलूस सहकारी बँक लि: पलूस

## ६० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(आर्थिक वर्ष दिनांक ०१/०४/२०२४ ते दिनांक ३१/०३/२०२५)

### - फक्त भागधारकांसाठी -

आपल्या बँकेच्या सर्व भागधारकांची **६० वी वार्षिक सर्व साधारण सभा रविवार, दिनांक २७/०७/२०२५ रोजी दुपारी ठिक ०२.०० वाजता विश्वनाथ मल्टिपर्पज हॉल, कन्या शाळा रोड, पलूस** येथे खालील विषयांवर विचार विनिमय करणेकरिता भरणार आहे. तरी बँकेच्या सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे, अशी नम्र विनंती आहे.

### --- सभेपुढील विषय ---

१) दिनांक २८/०७/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडिंग वाचून कायम करणे.
२) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
३) दिनांक ३१/०३/२०२५ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा–तोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
४) सन २०२४–२०२५ चे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण झालेले असून त्या ऑडिट मेमोचे वाचन करणे व स्विकारणे.
५) सन २०२३–२०२४ या आर्थिक वर्षाचा वैधानिक दोष दुरूस्ती अहवाल बँकेने सहकार खात्याकडे सादर केला आहे तो वाचून स्विकारणे.
६) सन २०२४–२०२५ मधील झालेल्या निव्वळ नफ्याची मा. संचालक मंडळाने सुचविलेली नफा वाटणी मंजूर करणे.
७) सन २०२४–२०२५ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे व सन २०२५–२०२६ सालासाठी अंदाजपत्रक मंजूर करणे.
८) रिझर्व्ह बँकेच्या सुचनेप्रमाणे सन २०२५–२०२६ साठी वैधानिक लेखापरिक्षक नेमणूकीचा प्रस्ताव रिझर्व्ह बँकेकडे पाठविला असल्याची नोंद घेऊन त्यास मान्यता देणे व या संदर्भात मा. संचालक मंडळास आवश्यक अधिकार प्रदान करणे.
९) सन २०२६–२०२७ साठी अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
१०) रिझर्व्ह बँकेच्या मंजुरीस पात्र राहून मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणे.
११) मा. संचालक मंडळाने सुचवलेल्या स्टाफींग पॅटर्न व सेवाविषयक नियमास मंजुरी देणे.
१२) संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
१३) सन २०२५–२०२६ मधील अपेक्षित भांडवली गुंतवणूक उदा. शाखांसाठी इमारत / बांधकाम / फर्निचर / संगणक प्रणाली / स्थिर गुंतवणूक इ. साठी होणाऱ्या भांडवली गुंतवणूकीची नोंद घेऊन त्यास मान्यता देणे.
१४) मा. अध्यक्षांचे अनुमतीने आयत्यावेळी आलेल्या विषयांचा विचार करणे.

मा. संचालक मंडळाचे आदेशावरुन

ठिकाण : **पलूस**
दिनांक : ०७.०७.२०२५

**श्री. अनिल नामदेव घारे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

#### सभासदांना नम्र विनंती

१) गणसंख्या पूर्तीचे अभावी सभा तहकूब झालेस सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी दुपारी ठिक ०२.३० वाजता भरेल व त्यास गणसंख्या पूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२) सभासदांना अहवाल, ताळेबंद व नफा–तोटा पत्रकासंबंधी काही माहिती पाहिजे असल्यास ती त्यांना बँकेच्या प्रधान कार्यालयात ऑफीस वेळेत मिळू शकेल. त्याचप्रमाणे सभासदांना सभेच्या वेळी काही प्रश्न विचारावयाचे असलेस त्यांनी ते दिनांक २२/०७/२०२५ पूर्वी बँकेच्या प्रधान कार्यालयात लेखी द्यावेत.
३) सभासदांनी मागणी केल्यास नजिकच्या शाखेत अहवालाचा अंक मिळेल तसेच बँकेची वेबसाईट www.palusbank.com यावरही उपलब्ध आहे.